POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र


○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५२ ● मुंबई, बुधवार,२४ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA


Sharad Navratri Colors 2025



| | |
|---|---|
| Sep 22, Monday | White |
| Sep 23, Tuesday | Red |
| Sep 24, Wednesday | Royal Blue |
| Sep 25, Thursday | Yelllow |
| Sep 26, Friday | Green |
| Sep 27, Saturday | Grey |
| Sep 28, Sunday | Orange |
| Sep 29, Monday | Peacock Green |
| Sep 30, Tuesday | Pink |

## देशात प्रदूषित नद्यांमध्ये महाराष्ट्र अव्वल

## ५४ नद्यांची भीषण अवस्था, मुंबईतील नद्या मरणासन्न का?



### मुंबईच्या नद्या की उघडे नाले?

मिठी, दहिसर, पोईसर, ओशिवरा आणि उल्हास या नद्यांची अवस्था पाहून प्रश्न पडतो, ही नदी आहे की गटार? प्रक्रिया न केलेले सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि घनकचरा यांनी या नद्यांचा श्वास गुदमरला आहे. अनेक कोटी रुपये खर्चून स्वच्छता मोहीमा राबवल्या गेल्या, पुनरुज्जीवनाचे आराखडे तयार झाले; पण प्रत्यक्षात पाण्याची गुणवत्ता सतत धोक्याच्या पातळीखाली आहे. विशेषतः मिठी नदीची स्थिती इतकी गंभीर आहे की ती मुंबईचा गटार म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. उढउइ च्या मानकांनुसार, ज्या नद्यांमधील पाण्यात बायोकेमिकल ऑक्सिजन डिमांड ३ मिग्रॅ/लिटरपेक्षा जास्त आहे, त्या प्रदूषित समजल्या जातात. मुंबईतील काही नद्यांमध्ये ही पातळी २० मिग्रॅ/लिटरपेक्षा जास्त आढळली—म्हणजे सुरक्षित मर्यादेपेक्षा अनेक पटींनी जास्त! देशभरात जरी प्रदूषित नद्यांची संख्या ३११ वरून २९६ वर आली असली, तरी त्यातल्या ५४ नद्या महाराष्ट्रातील असणे ही राज्यासाठी मोठी शरमेची बाब आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

एकेकाळी गावागावांतून वाहणाऱ्या नद्या या जीवनदायिनी होत्या. त्यांचं पाणी पिऊन माणसं जगत होती, शेतं हिरवीगार होत होती, संस्कृती फुलत होती. पण आज त्याच नद्या मरणासन्न झाल्या आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ताज्या अहवालाने धक्कादायक सत्य बाहेर आणलं आहे. देशभरात प्रदूषित नद्यांची संख्या किंचित कमी झाली असली तरी महाराष्ट्र मात्र या शर्यतीत ह्यपहिल्याह्ण स्थानी पोहोचला आहे. तब्बल ५४ नद्या प्रदूषणाच्या विळख्यात अडकल्या असून त्यापैकी मोठा भाग मुंबई महानगर प्रदेशातील आहे.

**फक्त कागदावरच्या योजना**

२०१६ मध्ये राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने राज्यांना नदी पुनरुज्जीवन आराखडे तयार करण्याचे आदेश दिले होते. महाराष्ट्राने समित्या स्थापन केल्या, अहवाल तयार केले, पण प्रत्यक्ष परिणाम शून्य! नदीकिनारी घरे, कारखाने, अनियंत्रित विकास आणि भ्रष्ट व्यवस्थापन यांनी नदी स्वच्छतेच्या प्रत्येक योजनेला पाण्यात गेलं आहे.

**तज्ज्ञांचा इशारा**

परिस्थिती तातडीने हाताळली नाही तर नद्यांचे पर्यावरणीय नुकसान अपरिवर्तनीय होईल, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पांचा विस्तार, सांडपाण्यावर कठोर नियंत्रण, आणि नदीकाठच्या जमिनीचे संरक्षण ही पावले उचलली नाहीत, तर महाराष्ट्रात नद्या फक्त इतिहासाच्या पानांत उरतील. सध्या, राष्ट्रीय जल गुणवत्ता निरीक्षण कार्यक्रमांतर्गत देशभरातील ६४५ नद्यांवरील २,१५५ ठिकाणी पाण्याची गुणवत्ता तपासली जाते, ज्यात महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणांचा समावेश आहे.

## देशातील सर्वात श्रीमंत महापालिकेच्या ठेवींमध्ये सातत्याने घट


## बीएमसीच्या अर्थसंकल्पानंतर कमी झाली गंगाजळी

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महापालिका निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याआधीच मुंबई महापालिकेसंबंधी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका अशी मुंबई महापालिकेची ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून या श्रीमंत महापालिकेच्या मुदत ठेवीमध्ये सातत्याने घट होत आल्याचे समोर आले.

2021-22 मध्ये मुंबई महापालिकेकडे 91 हजार 690.84 कोटी रुपयांचा ठेवी होत्या. त्यात आता 12 हजार 192 कोटींची घट झाली आहे. यंदाचा अर्थसंकल्प सादर झाला तेव्हा मुंबई महापालिकेकडे 81 हजार कोटींच्या ठेवी होत्या, त्या आता 79 हजार 498.59 कोटी रुपये राहिल्या आहेत. आरटीआयच्या माध्यमातून ही माहिती समोर आली आहे.

मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवी किती शिल्लक आहे याची विचारणा सामाजिक कार्यकर्ते गॉडफ्रे पिमेंटा यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत (RTI) केली. त्यांनी मुंबई महापालिकेकडील अलिकडच्या काही वषार्तील मुदत ठेवींचा तपशील मागितला होता. महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्याकडे विविध बँकेत मिळून 79 हजार 498.59 कोटी रुपये शिल्लक राहिल्या आहेत.



कोणत्या बँकेत किती ठेवी?

1) स्टेट बँक ऑफ इंडिया - 40,579.70 कोटी रुपये

2) आयसीआयसीआय - 21,988.25 कोटी रुपये

3) एचडीएफसी - 21,982.30 कोटी रुपये

4) यूनियन बँक ऑफ इंडिया - 12,528.00 कोटी रुपये

महापालिकेच्या विविध विभागांचा शिल्लक निधी हा मुदत ठेव म्हणून बँकामध्ये ठेवलेला असतो. विविध बँकाचे व्याजदर तपासून सर्वाधिक व्याजदर देणाऱ्या बँकेमध्ये हे पैसे मुदत ठेव म्हणून ठेवले जातात. पालिकेच्या 79 हजार 498.59 कोटी रुपयांच्या मुदत ठेवीपैकी 39 हजार 543 कोटींची रक्कम कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, पीएफ, उपदान, विशेष निधी यासाठी वापरणे बंधनकारक आहे.

मुदत ठेवीला का लागली गळती

महापालिकेमधील मुदत ठेवींना आतापर्यंत कधी हात लावला गेला नाही.

मात्र पालिकेवर प्रशासक राज सुरु झाले तेव्हापासून पालिकेच्या मुदत ठेवींना गळती लागल्याचा आरोप होत आहे. महापालिकेने काही वर्षांपासून पायाभूत सुविधांसाठी मुदत ठेवीची रक्कम घेण्यास सुरुवात केली, असे महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी अर्थसंकल्प सादर करताना सांगितले होते. गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता, सागरी किनारा प्रकल्प, मलनिस्सारण प्रकल्प या मोठ्या प्रकल्पांसाठी तसेच काही दीर्घकाळ चालणाऱ्या प्रकल्पांसाठी मुदत ठेवींचा निधी संलग्न करण्यात आला. त्यामुळे या प्रकल्पांची देणी देताना मुदत ठेवी कमी होत गेल्या.

## मुंबईत ‘संस्कृती २०२५’ कार्यक्रमांचे आयोजन

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट (UM-GICED) तर्फे, जागतिक पर्यटन दिनानिमित्त ‘संस्कृती २०२५’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यटन मंत्रालय आणि अतुल्य भारत यांच्या सहयोगाने होणाऱ्या या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे भारतीय परंपरा, वारसा आणि संस्कृतीचे दर्शन घडविण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात १९ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या हेरिटेज वॉकने होईल. त्यानंतर २५ सप्टेंबर २०२५ रोजी कल्चरल परेड, कल्चरल मेला आणि रील्स स्पर्धा अशा आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये पर्यटनाबाबत जागरूकता निर्माण करणे, सांस्कृतिक वैविध्य साजरे करणे तसेच वारशाचे संवर्धन करणे हा आहे. ‘संस्कृती २०२५’ मध्ये विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक विद्यार्थ्यांनि मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेच्या ट्रॅव्हल अँड टुरिझम विभागाच्या वतीने करण्यात आले आहे..




| EVENTS | DATE |
|---|---|
| Heritage walks | 19th sept - 22rd sept 2025 |
| Cultural Parade | 25th sept 2025 |
| Cultural Mela | 25th sept 2025 |
| Reels Competition | 25th sept 2025 |

## घाटकोपर बेकायदेशीर जाहिरात फलक दुर्घटना; संबंधित विभागांना एक महिन्याच्या मुदतीत कार्यवाहीचे निर्देश


■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईमधील घाटकोपर येथे बेकायदेशीर फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या उच्च स्तरीय चौकशीसाठी स्थापन न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शिफारशींसह स्वीकारण्यास. तसेच समितीचे निष्कर्ष, व सुचविलेल्या उपाययोजनांवर करावयाच्या अंलबजावणीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यावर संबंधित विभागांना एक महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.



घाटकोपर येथे १३ मे २०२४ रोजी वारा व मुसळधार पावसामुळे प्रचंड आकाराचा जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळला होता. या दुर्घटनेत १७ नागरिकांचा मृत्यू आणि ८० हून अधिक नागरिक जखमी झाले होते. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी राज्य शासनाने माजी न्यायमुर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने मुख्यमंत्री महोदयांकडे यापुर्वीच अहवाल सादर केला होता. न्या. भोसले यांच्या अहवालातील निष्कर्ष व समितीने सुचविलेल्या उपाययोजनांवर पडताळणी करण्यासाठी गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीने आज मंत्रिमंडळासमोर विविध विभागांनी करावयाच्या अंमलबजावणीचा कृती अहवाल सादर केला. त्यानुसार या अहवालातील शिफारशीवर आता संबंधित विभागांना एक महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करावी लागणार आहे. यात समितीने अशा फलकांच्या नियमित तपासणी करण्याबरोबरच, कोणत्या गोष्टींची खबरदारी घ्यावी याबाबतही सूचना केल्या आहेत. मार्गदर्शक तत्वे म्हणून २१ मुद्यांची शिफारस केली आहे. अनधिकृत फलकांवरील कारवाईसाठी नोडल यंत्रणा नियुक्त करणे. कारवाईसाठी महापालिका यंत्रणांना संपूर्ण अधिकार असल्याचे नमूद केले आहे. याशिवाय अशा फलकांचा आकार जास्तीत जास्त ४० फूट बाय ४० फूट असावा. ते टेरेसवर किंवा कंपाऊड वॉलवर लावू नयेत अशा शिफारशी केल्या आहेत.

## ओला, उबर, रॅपिडोचे दर नियमाप्रमाणे; आजपासून आकारणी, उल्लंघन केल्यास कठोर कारवाई




### प्रवाशांना दिलासा, कॅब चालकांनाही योग्य मोबदला!

■**मुंबई । प्रतिनिधी,**

ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲग्रीगेटर्सद्वारे जादा प्रवासी भाडे आकारताना कॅब चालकाला मोबदलाही कमी दिला जात होता. त्यामुळे परिवहन विभागाने त्यावर कारवाई करून निश्चित दर ठरवून त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहे. परंतु, नियमानुसार दर आकारणी केली जात नसल्याने २३ सप्टेंबर रोजीपासून ओला, उबर, रॅपिडोचे कॅबचालक सरकारी नियमाप्रमाणे प्रवासी दर आकारले जाईल.

ओला, उबरसारख्या ॲप आधारित टॅक्सी सेवांच्या चालकांना प्रतिकिमी ८ ते ९ रुपये दिले जातात. त्यात इतर वाहतूक खर्च असल्याने चालकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होते. त्यामुळे ॲप आधारित टॅक्सी चालकांनी संप, आंदोलने, शासनाशी पत्रव्यवहार केला. तसेच, ॲप आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांकडून प्रवाशांची आर्थिक लूट होत होती. ही लूट रोखण्यासाठी, परिवहन विभागाने ओला, उबर, रॅपिडोसारख्या कंपन्यांद्वारे वाढीव किमत मर्यादित केली आहे.

रिक्षा आणि कॅब यासाठी आरटीओ विभागाने निश्चित केलेले दर ॲग्रीकेटरला लागू होतील. टॅक्सीसाठी प्रतिकिमी २०.६६ रुपये आणि वातानुकूलित टॅक्सीसाठी प्रतिकिमी २२.७२ रुपये दर असेल. नव्या दरपत्रकाचे पालन न केल्यास परिवहन विभागाद्वारे कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच, ओला, उबर, रॅपिडो कंपन्यांना प्रत्येक वाहन फेरीद्वारे गोळा केलेल्या भाड्याच्या किमान ८० टक्के रक्कम चालकांना देणे बंधनकारक केले आहे.

बाईक टॅक्सी चालवणाऱ्या ज्या कंपन्यांवर राज्याच्या परिवहन विभागाने गुन्हे दाखल केले. त्या कंपन्यांना ई-बाइक टॅक्सीसाठी तात्पुरता परवाना देते. पांढऱ्या रंगाच्या वाहन क्रमाकांच्या पाट्या आणि पेट्रोलवर धावणाऱ्या बाइकचा वापर केला जात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ॲग्रीगेटर कंपनीकडून नियम धुडकावले जात आहेत. गुन्हे दाखल झालेल्या तिन्ही कंपन्यांना बाइक टॅक्सी परवान्यासाठी सरकारने काळ्या यादीत टाकणे आवश्यक आहे, असे मत भारतीय गिग कामगार मंचाद्वारे व्यक्त करण्यात आले.

ॲप आधारित कॅब चालक आता ओन्ली मीटर या संकेतस्थळाचा वापर करून दर आकारणार आहेत. प्रवाशांनी ओला, उबर किंवा इतर ॲपवरून कॅब आरक्षित केल्यानंतर, त्या ॲपवर दर्शविण्यात येणारे भाडे न आकारता, ओन्ली मीटर या संकेतस्थळावरून भाडे आकारले जाईल. ॲपवर दाखविण्यात आलेल्या किमी हे ओन्ली मीटर संकेतस्थळावर देऊन, एकूण प्रवासाचे दर त्यात येईल.

हचबॅक म्हणजेच छोट्या गाड्यांसाठी २८ रुपये प्रति किमी दर आकारले जातील.

सेडान म्हणजेच मध्यम गाड्यांसाठी ३१ रुपये प्रतिकिमी दर आकारले जातील.

एस यु व्ही म्हणजेच मोठ्या गाड्यांसाठी ३४ रुपये प्रति किमी दर आकारले जातील.

## टोरेसनंतर पुन्हा घोर फसवणूक, शेअर मार्केटच्या नावाखाली कोट्यवधींचा गंडा; ळहख कंपनीविरुद्ध चिपळूणमध्येही गुन्हा

■ **रत्नागिरी। प्रतिनिधी, :**

जास्त परताव्याच्या अमिषाला बळी पडून पुन्हा एकदा गुंतवणूकदारांची घोर फसवणूक झाल्याचं उघडकीस आलं आहे. TWJ म्हणजेच ट्रेड विथ जॅझ कंपनीकडून जादा पतवाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याने गुंतवणूकदारांच्या डोळ्यात पाणी आलं आहे. यवतमाळ नंतर ळहख कंपनीच्या संचालकांवर चिपळूणमध्येही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राज्यातील विविध भागात ळहख कंपनीच्या विरोधात गुंतवणूकदार आक्रमक बनले आहेत. कंपनीचे संचालक समीर नार्वेकर, त्याची पत्नी नेहा नार्वेकरसह शाखा व्यवस्थापक संकेश घाग यांच्यावर चिपळूण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुंतवणूकदार पंकज माटे यांच्या तक्रारीनंतर चिपळूण मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेअर मार्केटच्या आधारावर TWJ कंपनीत सुमारे अकरा हजार गुंतवणूकदार असल्याची माहिती आहे. मुंबईच्या दादर येथील टॉरेस घोटाळा प्रकरणानंतर आता टीडब्लूजे हा आणखी एक घोटाळा समोर आला असून ठाणे आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू. दरम्यान, राज्यभरातील विविध भागात TWJ कंपनीच्या जवळपास 20 शाखा असल्याची माहिती समोर आली आहे. यवतमाळ नंतर TWJ कंपनीच्या संचालकांवर चिपळूणमध्येही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राज्यातील विविध भागात TWJ कंपनीच्या विरोधात गुंतवणूकदार आक्रमक बनले आहेत. आपली झालेली फसवणूक लक्षात येताच पोलीस स्टेशनला खेटे मारत कंपनीविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे. गुंतवणूकदारांनी गुंतवलेल्या रकमेवर महिन्याला 3 ते 5 टक्के व्याजदर परतावा देण्याची कंपनीची योजना होती.



म्हणे मोठा परतावा, शेअर मार्केटचा नादच बेक्कार

या कंपनीच्या योजनेच्या अमिषाला बळी पडून कित्येक गुंतवणूकदारांनी आपले पैसे गुंतवले होते, जे कोट्यवधी रुपये आहेत. मात्र, मागील 5 महिन्यांपासून गुंतवणूदारांना व्याजाचा परतावा न दिल्यामुळे गुंतवणूकदार बेजार झाले होते. अखेर, कंपनीचे संचालक समीर नार्वेकर, त्याची पत्नी नेहा नार्वेकरसह शाखा व्यवस्थापक संकेश घाग यांच्यावर चिपळूण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, यवतमाळमधील जांब रोड येथील TWJ फ्रँचाईस बिझनेस अग्रीमेंट कंपनीने पैसे गुंतवणीचा बदल्यात अधिक व्याज देण्याच्या प्रलोभनातून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचं आता उघडकीस आलं आहे. 3% ते 4 % दराने दोन तीन महिने सुरळीत व्याज दिल्यानंतर ग्राहकांनी व्याज व मुद्दल परत मागितल्यास TWJ कंपनीकडून उडवा उडवीचे उत्तर देत टाळाटाळ करण्यात आल्याने आपी फसवणूक झाल्याचं गुंतवणूकदारांच्या लक्षात आलं. गजेंद्र श्रावणजी गणवीर व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे 29 लाख रुपये व तसेंच इतर ग्राहकांची एकूण 3 कोटी रुपयांची फसवणूक कंपनीकडून करण्यात आली आहे. शेवटी फियार्दी गजेंद्र श्रावनजी गणवीर (वय 55 रा अंबिका नगर) यवतमाळ यांच्या फियार्दीवरून 21सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 1 वाजेच्या सुमारास ळहख फ्रँचाईस बिजनेस अग्रीमेंट कंपनी विरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी, आरोपी समीर नार्वेकर (वय 40 वर्ष) CMD TWJ असो. प्रा. लि. पुणे, सागर मयलवार (वय 38 वर्ष) शाखा व्यवस्थापक ळहख.असो. प्रा. लि. यवतमाळ, आणइ सुरज माडगुलवार (वय 37 वर्ष) लेखापाल ळहख असो. प्रा. लि. यवतमाळ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम 1306/25 कलम 316/(2),318(4),3(5) कलम 3,4 अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास अवधूतवाडी पोलीस करीत आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# जामिनावरील सुनावणीसाठी सुप्रीम कोर्टाची चतुःसूत्री



Bail is rule, Jail is exception, हे तर आपण ऐकतच आलो आहे. सर्वोच्च न्यायालयाने राजस्थान सरकार विरुद्ध बालचंद या खटल्यामध्ये पहिल्यांदा या तत्त्वाचा उल्लेख केला. प्रख्यात विधिज्ञ आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश कृष्णा अय्यर यांनी पहिल्यांदा या तत्त्वाचा वरील खटल्यामध्ये उल्लेख केला. पुढे गुरबक्ष सिंग सिब्बा विरुद्ध पंजाब सरकार या गाजलेल्या खटल्यामध्येही या तत्त्वाचा उल्लेख केला आणि जामिनासाठीचे निकष विशद केले गेले. कोणत्याही आरोपीला अटक केल्यानंतर संबंधित खटला कायद्याद्वारे निर्धारित सुयोग्य न्यायालयात चालला पाहिजे. तिथे त्या आरोपीला त्याची बाजू मांडता आली पाहिजे. स्वतःचा बचाव करता आला पाहिजे. त्याला त्याची बाजू मांडण्यासाठी वकील उपलब्ध झाला पाहिजे. या सगळ्यातून गेल्यानंतर जर न्यायालयाने त्याला दोषी ठरवले आणि त्याला शिक्षा सुनावली तर त्याची रवानगी कारागृहात होते. हे सगळे वरवर सहजसोपे दिसत असले, तरी वास्तविक परिस्थिती तशी नसते. अनेकवेळा केवळ आरोप असलेल्या व्यक्ती सुनावणी सुरू असण्याच्या काळात कच्चे कैदी म्हणून कारागृहात अनेक वर्षे अडकून पडतात. अशा आरोपींना कैदेतून बाहेर काढण्यासाठी जे कायदेशीर आयुध वापरले जाते, ते म्हणजे जामीन. जर अटक होण्यापूर्वीच हे आयुध वापरायचे असेल तर अटकपूर्व जामिनाचा पर्याय असतो. हे सगळे पुन्हा एकदा सांगण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने याच महिन्यात दिलेला एक निकाल. त्यामध्ये जामीन आणि अटकपूर्व जामीन अर्जांवर संबंधित उच्च न्यायालयांनी आणि सत्र न्यायालयाने निर्धारित वेळेत सुनावणी घेऊन निर्णय घ्यावेत, असे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासाठी चतुःसूत्रीच आखून दिली.

अण्णा भालेराव विरुद्ध महाराष्ट्र सरकार या खटल्यावरील निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे. बी. परडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ही चतुःसूत्री आखून दिली. यामध्ये प्रत्येक राज्यातील उच्च न्यायालयांना आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सत्र न्यायालयांना सूचना करण्यात आल्या आहेत. आपल्याकडे राज्यघटनेच्या अनुच्छेद 21 नुसार प्रत्येक नागरिकाला जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार मिळाला आहे. हा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे तो कायद्याद्वारे निर्धारित प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय कोणाचाही काढून घेता येत नाही. गुन्हा केल्याच्या आरोपावरून एखाद्याला अटक नक्कीच करता येते. पण त्याची पद्धत निश्चित आहे. त्याच पद्धतीने पोलिसांना अटक करावी लागते. राज्यघटनेच्या अनुच्छेद 22 (2) मध्ये संबंधित आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला 24 तासांच्या आत संबंधित पोलिस ठाण्याशी संलग्न असलेल्या न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे हजर करावे, असा उल्लेख आहे. या अटकेबद्दल तिथे पोलिसांना आणि सरकारी वकिलांना न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे माहिती द्यावे लागते. यानंतर न्यायदंडाधिकाऱ्यांकडून त्याची दखल घेतली जाते आणि पुढील कारवाई केली जाते. मग आरोपीला पोलिस कोठडी किंवा न्यायालयीन कोठडी सुनावली जाते. दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्ह्यांमध्येच पोलिसांना या पद्धतीने अटक करण्याचा अधिकार आहे, हे सुद्धा समजून घेतले पाहिजे. कोणत्याही आरोपीला दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्ह्यामध्ये अटक होण्याची शक्यता वाटत असेल, तर तो वकिलांच्या मार्फत सत्र न्यायालयात किंवा गरजेप्रमाणे उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करू शकतो. जर अटक झाली असेल, तर अशावेळी जामिनासाठीही अर्ज दाखल करू शकतो. त्यावर सरकारी पक्ष आणि बचाव पक्ष या दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालय निर्णय देते. बरेचवेळा वेगवेगळ्या कारणांमुळे जामिनासाठीच्या अर्जांवरील सुनावणी मागे पडते आणि आरोपीला कोठडीतच राहावे लागते. याचीच गंभीर दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये चतुःसूत्री आखून दिली. चतुःसूत्रीमध्ये पहिल्या भागात म्हटले आहे की, ज्या उच्च न्यायालयांपुढे किंवा त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सत्र न्यायालयांकडे जामीन किंवा अटकपूर्व जामीनाचे अर्ज प्रलंबित आहेत. तिथे ते लवकरात लवकर निकाली काढले पाहिजेत. यासाठी सर्वोच्च न्यायालयने दोन महिन्यांचा कालावधी निर्धारित करून दिला आहे. जामिनासाठी आरोपीने अर्ज केल्यापासून दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यावर सुनावणी घेऊन तो अर्ज निकाली काढला पाहिजे. सत्र न्यायालयांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या खटल्यातील आरोपीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याशी जोडलेल्या जामीन अर्जावरील सुनावणीसाठी प्राधान्यक्रम लावला पाहिजे. तशा स्वरुपाचे निर्देश तेथील उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयांना द्यावेत, असे दुसऱ्या भागात म्हटले आहे.

चतुःसूत्रीच्या तिसऱ्या भागांत सर्वोच्च न्यायालयाने तपास संस्थांनाही निर्देश दिले आहेत. खूप जुन्या प्रकरणांमध्ये तपाससंस्थांनी त्यांच्याकडील तपास लवकरात लवकर संपवावा. जेणेकरून तपासाबद्दल आरोपी किंवा तक्रारदार यांच्या मनात कोणताही किंतूपरंतु राहणार नाही. प्रत्येक राज्यामध्ये तेथील उच्च न्यायालय ही त्या राज्यापुरती सर्वोच कायदेशीर संस्था आहे, याचा विचार करून उच्च न्यायालयांनी जामीन किंवा अटकपूर्व जामिनाचे अर्ज निकाली काढण्यासाठी कार्यपद्धती आखावी. ही कार्यपद्धती आखताना किती जामीन आणि अटकपूर्व जामीन अर्ज प्रलंबित आहेत, याचाही आधी विचार केला जावा. हे सर्व करताना अटकेत असलेल्या कोणत्याही आरोपीचे वैयक्तिक स्वातंत्र्य धोक्यात येणार नाही, याची दखल घ्यावी. तसेच जामीन आणि अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी मोठ्या कालावधीसाठी प्रलंबित ठेवू नये. त्यावर शक्य तितक्या लवकर निर्णय घेतला जावा. जेणेकरून आरोपीचे मूलभूत अधिकार धोक्यात येणार नाहीत, असे चौथ्या भागात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार यांनी हे आदेश देशातील सर्व उच्च न्यायालयांपर्यंत वितरित करावेत आणि या आदेशांची तातडीने अंमलबजावणी केली जावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. आपल्या या निकालपत्रामध्ये न्या. आर. महादेवन यांनी असेही म्हटले आहे की, कोणत्याही आरोपीचे व्यक्तिगत स्वातंत्र्य अनिश्चिततेच्या भोवऱ्यात गुंतवून प्रलंबित ठेवणे योग्य नाही. प्रत्येक खटल्यामध्ये त्यातील तथ्ये आणि पुरावे यांच्या आधारे त्या प्रकरणातील आरोपीच्या जामीन अर्जावरील सुनावणी लवकरात लवकर घेऊन त्यावर निर्णय दिला पाहिजे.

# घटस्थापनेचा 'घट'मुहूर्त




देशातील करपद्धतीत मूलभूत बदल करणारी वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली सन २०१७मध्ये अमलात आली. करांचे चार टप्पे व कागदपत्रांच्या सादरीकरणातील कमालीची क्लिष्टता हे त्यात जन्मजात असे प्रमुख दोष होते. त्यामुळे या दोषांच्या निवारणाची विनंती/मागणी विविध घटक तेव्हापासूनच करीत होते. अखेर त्या दोषांचे निवारण करून नव्या सुधारित स्वरूपातील जीएसटी प्रणाली लागू झाली आहे. जीएसटीमधील 'घट' लागू करण्यासाठी नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा, घटस्थापनेचा मुहूर्त मोदी सरकारने निवडला. नव्या जीएसटी रचनेमुळे विविध खाद्यपदार्थांपासून ते आरोग्य-जीवन विम्यापर्यंत अनेक गोष्टींसाठी आधीच्या तुलनेत कमी पैसे मोजावे लागणार असल्याने सामान्य नागरिकांत दिलाशाचे वातावरण आहे, ते अगदी स्वाभाविक म्हणायला हवे. वस्तूंच्या किमती घटल्याने त्याचा खप व पयार्याने उत्पादन वाढते आणि एकंदरच अर्थचक्रास गती मिळते, हा बाळबोध नियम. आत्ता सुरू असलेला नवरात्रोत्सव आणि येऊ घातलेली दिवाळी अशा पार्श्वभूमीवर अर्थचक्रास गती मिळणे सामान्यांच्या व देशाच्याही लाभाचे.

जीएसटीतील कपातीमुळे होणारी स्वस्ताई सामान्यांपर्यंत पोचवणे ही आता उत्पादकांची जबाबदारी आहे. त्याचवेळी, हा निर्णय होण्याआधी कच्चा माल खरेदी केला अधिक दराने व त्यातून निर्माण झालेला पक्का माल आता विकावा लागणार कमी दराने, असा मुद्दा सोमवारी मोठ्या प्रमाणात उत्पादकांकडून मांडला गेला. यावरून अद्याप असलेला गोंधळ तातडीने दूर करणे ही आता सरकारची जबाबदारी आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरता आहे. त्यांच्या आयातशुल्क निर्णयाचा मोठा फटका भारतालाही बसू शकतो. त्या फटक्याची तीव्रता कमी करण्याचे काम जीएसटी कपातीचा निर्णय करू शकतो, असे तज्ज्ञ मानतात.

या सगळ्यांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वदेशी'चा धरलेला आग्रह महत्त्वाचा मानायला हवा. पण असा आग्रह हा केवळ भावनिक आवाहनांपुरता उरता कामा नये. सरकारला मनापासून वाटत असेल तर, आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही 'स्वदेशी'ची अंमलबजावणी देशासाठी व देशवासीयांसाठी कशी व्यवहार्य व फायदेशीर ठरू शकते, हे सरकारने पटवून द्यावे लागेल. त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस अशी काही रचना उभारावी लागेल. त्यात सातत्य राखावे लागेल. अर्थकारण हे भावनांच्या हिंदोळ्यावर चालत नाही. तेथे रोकडे सत्यच लागते, हे सरकार जाणत असणारच, ही अपेक्षा.

# ट्रम्प यांचे 'व्हिसा' अस्त्र




अमेरिकेला ह्यमहानह्ण करण्याचा विडा उचलणारे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातशुल्काचे शस्त्र कायम ठेवतानाच आता एचवनबी व्हिसाचे नवे शस्त्र हाती घेतले आहे. अमेरिकेत काम करण्याचा परवाना देणाऱ्या या व्हिसाच्या शुल्कात वीस ते पन्नास पटींनी वाढ करीत ते एक लाख डॉलरवर नेण्याचा त्यांचा निर्णय स्थानिकांना कितपत उपयुक्त ठरेल हे येणारा काळच ठरवेल; परंतु यामुळे भारताला आणखी एक फटका बसणार यात शंका नाही.

माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी यांसारख्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांतील कुशाग्र बुद्धिमत्तेच्या कुशल व्यावसायिकांना एचवनबी व्हिसा दिला जात असला, तरी त्याचा दुरुपयोग होत असून, सामान्य कुवतीच्या कामगारांनाही तो मिळत असल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. तो पूर्णपणे चुकीचा आहे, की अंशतः हा वाद आता घालण्यात अर्थ नाही. एकदा एक सिद्धांत बनविला, की तो खरा की खोटा याची शहानिशा न करता ट्रम्प त्याला चिकटून राहतात, असा आजवरचा अनुभव आहे. व्हिसाचे शुल्क कमी असल्याने बाहेरील लोक येऊन स्थानिक कामगारांच्या नोकऱ्या हिरावून घेतात. असे सांगून ट्रम्प यांनी जबरी शुल्कवाढीचे समर्थन केले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे स्थानिक रोजगार वाढतील का आणि अमेरिकेवर काय परिणाम होईल, यावर चर्चा करण्यातही अर्थ नाही; त्यासाठी ट्रम्प समर्थ आहेत. मात्र, याचा भारतावर काय परिणाम होईल, हे पाहायला हवे.

एचवनबी व्हिसा पद्धतीचा सर्वांत मोठा लाभार्थी भारतच आहे. गेल्या वर्षी अमेरिकेत जितके एचवनबी व्हिसा वितरित केले गेले, त्यांपैकी ७१ टक्के व्हिसा भारतीयांना मिळाले होते. साधारणतः दर वर्षी ६५ हजार एचवनबी व्हिसा वितरित केले जातात. याशिवाय अमेरिकेतून उच्च शिक्षण घेतलेल्या परदेशींसाठी वीस हजार व्हिसा असतात. तीन वर्षांसाठीच्या या परवान्याला पुढे आणखी तीन वर्षांची मुदतवाढही गरजेनुसार मिळू शकते. कामाच्या आवश्यकतेनुसार कंपन्या एचवनबी व्हिसाची मागणी करीत असतात; व्हिसा शुल्कही तेच भरत असतात. या शुल्कात मोठी वाढ झाल्याने या कंपन्या नव्याने परदेशी कर्मचारी घेण्याची शक्यता कमी दिसते. याचा फटका भारताला अर्थातच बसणार.

ट्रम्प यांच्या ५० टक्के आयातशुल्काचा फटका सध्या भारत सहन करतो आहेच. त्यात आता ही भर. देशातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा आकार २८३ अब्ज डॉलरचा असून, तो आयातशुल्कवाढीचे, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचे आव्हान आधीच पेलत आहे, तो आणखी अडचणीत येऊ शकतो. देशातील सॉफ्टवेअर उद्योगाची शिखर संस्था असलेल्या नॅसकॉम ने याची कबुलीही दिली आहे. भारतीय प्रतिभावानांच्या संधी यामुळे मर्यादित होण्याबरोबरच भारत आणि अमेरिका येथील कंपन्यांद्वारे संयुक्तपणे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची गतीही मंदावण्याची भीती आहे. ट्रम्प यांचे हे पाऊल भारताला मागे खेचणारे ठरू शकते. मात्र, संकटाचे रूपांतर संधीत करण्याचे ठरविल्यास ते भारताला पुढे नेणारेही ठरेल.

ट्रम्प यांच्या निर्णयामुळे अमेरिकेत जाऊ इच्छिणारे व्यावसायिक आणि प्रतिभावंत आता अन्य देशांचा विचार करतील; किंवा देशातच राहणे पसंत करतील. भारतातून परदेशी जाणाऱ्या प्रतिभावंतांचा उल्लेख एके काळी ब्रेन ड्रेन असा केला जात असे. ट्रम्प यांच्या कृपेने तूर्तास तरी ब्रेन ड्रेनला आळा बसू शकेल. त्याचबरोबर भारतातून तंत्रज्ञ मिळत नसल्याने तेथील काही कंपन्या भारतात येऊ शकतात. यामुळे देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळू शकते आणि देशाची जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकता वाढू शकते.

अमेरिकेच्या निर्णयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना निती आयोगाचे माजी मुख्याधिकारी अमिताभ कांत यांनी अशाच प्रकारचे भाष्य केले आहे. भारताचे प्रतिभावान डॉक्टर, इंजिनीअर, शास्त्रज्ञ हे आता देशातच राहून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करतील, असे नमूद करतानाच त्यांनी, बेंगळुरू, हैदराबाद, पुणे, गुरुग्राम ही भारतीय माहिती तंत्रज्ञान केंद्रे अधिक गतिमान होतील, असे म्हटले आहे. हा आशावाद प्रत्यक्षात आणण्यासाठी पोषक वातावरणाची गरज आहे. ते नसल्यानेच आजवर ब्रेन ड्रेन होत आला आहे, हे नाकारता येणार नाही. रस्त्यांवरील खड्ड्यांपासून लालफितीच्या कारभारापर्यंत आपल्या नागरी आणि उद्योग सुविधा खालावत असताना एचवनबी व्हिसा संकटाचे संधीत रूपांतर कसे होणार, हा प्रश्न कायम आहे.

# राजकारणातला खोटा सिक्का



राहुल गांधींनी महाराष्ट्र विधानसभेच्या निकालानंतर ईव्हीएमपासून मतदारयादीपर्यंत अनेक आरोपांची सरबत्ती केली; मात्र हे आरोप वास्तवापेक्षा चुकीचे असल्याचे वारंवार उघड झाले. पुरावे असूनही न्यायालयात न जाण्याचे हास्यास्पद कारण देत त्यांनी स्वतःच स्वतःचे हसे केले.

युवराज राहुल गांधींची राजकारणातील हतबलता दिवसागणिक वाढत चालली आहे. सातत्याने येणाऱ्या अपयशामुळे ही हतबलता टोकाच्या नैराश्यवादाकडे झुकली गेली. आता ही हतबलता खोटेपणाच्या सर्व मयार्दा पार करू लागली आहे. खोटेपणाशिवाय आपल्याला राजकारणात तरता येणार नाही, असा समज करून घेऊन युवराजांनी नोव्हेंबर, २०२४ पासून म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचे निकाल जाहीर झाल्यापासून एका मागोमाग एक असत्य कथन करण्याचा सपाटा लावला आहे. अशा खोटेपणातून त्यांची राजकारणातील विश्वासार्हताही दिवसागणिक घटत चालली आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे निकाल जाहीर झाल्यानंतर राहुल गांधी, शरद पवार आणि उबाठा या तिघांना सर्वाधिक धक्का बसणे स्वाभाविक होते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीवर सरशी मिळवल्यामुळे राहुल गांधी, शरद पवार आणि उबाठा या तिघांनाही महाराष्ट्राची सत्ता मिळण्याची स्वप्ने पडू लागली होती. हरयाणातील जनतेने अपेक्षाभंग करत भारतीय जनता पाटीर्ला पुन्हा बहुमत दिल्यानंतर राहुल गांधींना राजकारणातल्या बदलत्या वास्तवाची जाणीव व्हायला हवी होती; मात्र या वास्तवाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे त्यांना महाराष्ट्रातील निकालाचे सर्वाधिक दुःख झाले. या अपेक्षाभंगातून डिसेंबर २०२४ मध्ये त्यांनी महाराष्ट्रातील महाआघाडीच्या पराभवाचे खापर ह्यईव्हीएमह्णवर फोडले. ह्यईव्हीएमह्ण बद्दलच्या शंकांचा महापूर गेल्या १० वर्षांत आल्यामुळे युवराजांच्या या शंकेला कोणी गंभीरपणे घेतले नाही. मग त्यांच्या सल्लागारांनी युवराजांना मतदानाच्या आकडेवारीचा आधार घेत संध्याकाळी पाच नंतर वाढलेल्या मतदानाच्या टक्क्याविषयी संशय घेण्यास सांगितले. संध्याकाळी पाच नंतर १३ ते १५ टक्के एवढे मतदान संशयास्पदरित्या वाढले, असा आरोप युवराजांनी मतदानाच्या आकडेवारीचे कागद पत्रकार परिषदेत सादर करत केला.

ज्यांना मतदानाच्या दिवशी कोणत्या पद्धतीने मतदान होते, कोणत्या पद्धतीने मतदान करून घ्यावे लागते, याची प्राथमिक जाण आहे, अशा बूथपातळीवरच्या कोणत्याही पक्षाच्या कार्यकत्यार्ला संध्याकाळी पाच नंतर मतदान का वाढते, हे ठाऊक असते. सकाळी आठ ते संध्याकाळी पाच या वेळेत साधारणतः ५० टक्के मतदान होते. त्यानंतर मतदारांच्या रांगा मतदान केंद्राबाहेर लागतात. खरे तर मतदान वाढण्याची सुरूवात दुपारी तीन वाजल्यापासून होते. दुपारी तीनच्या आधीपासून उमेदवारांचे कार्यकर्ते कोण-कोणत्या भागातील, वस्तीतील, वसाहतीतील किती मतदान बाकी आहे, याचा आढावा घेऊ लागतात. मग मतदार यादी हातात घेऊन कार्यकर्ते आपले हक्काचे मतदान करून घेण्यासाठी पळापळ करू लागतात. युवराजांनी आपण मोठा गौप्यस्फोट केल्याच्या आवेशात निवडणूक आयोगाने पाच वाजेपर्यंत ५८टक्के मतदान झाल्याचे जाहीर केले होते; मात्र अंतिम आकडेवारीत निवडणूक आयोगाने ६६टक्के मतदान झाल्याचे घोषित केले, याकडे लक्ष वेधले. या आठ टक्के मतदानावर युवराजांनी संशय व्यक्त केला. निवडणूक आयोग पाच वाजेपर्यंत झालेले सरासरी मतदान घोषित करत असते. सहा वाजेपर्यंत मतदान केंद्राच्या आवारात दाखल झालेल्या सर्व मतदारांना मतदान करू दिले जाते. त्यामुळे अनेक ठिकाणी रात्री सात, आठ वाजेपर्यंत मतदान चालल्याच्या घटना घडल्या आहेत. हे वास्तव काँग्रेसच्या गल्ली-बोळातल्या कार्यकर्त्यांना माहीत असते; मात्र राहुल गांधींच्या एमबीए, सॉफ्टवेअर इंजिनिअर यासारख्या पदव्या बाळगणाऱ्या सल्लागारांना मतदानाची वास्तव माहिती कधीच ठाऊक होणार नाही. या सल्लागारांनी युवराजांना पाच नंतर एवढे मतदान वाढलेच कसे? असा प्रश्न उपस्थित करण्यास सांगितले. त्यानुसार युवराजांनी वाढलेल्या मतदानाविषयी आपण न्यूटनसारखा मोठा शोध लावल्याचा आव आणत निवडणूक आयोगावर आरोपांच्या फैरी झाडल्या.

निवडणूक आयोगाने संध्याकाळी पाच नंतर झालेल्या मतदानाविषयी खुलासा केल्यामुळे युवराजांचा आरोपांचा हा बारही फुसका निघाला. यानंतर युवराजांनी लोकसभा ते विधानसभा निवडणुकी दरम्यान महाराष्ट्रात वाढलेल्या मतदारांच्या आकड्यांचा आधार घेत निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पार्टीवर आरोप केले. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात एक कोटी मतदार वाढले, असा आरोप युवराजांनी केला होता. प्रत्यक्षात महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान ४० लाख मतदार वाढले होते, असे निदर्शनास आले होते. २००९ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीची केंद्रात व राज्यात सत्ता असताना महाराष्ट्रात लोकसभा व विधानसभा निवडणुकीदरम्यान ६० लाख हून अधिक मतदान वाढले होते; मात्र अशा गोष्टी जाणून न घेता सल्लागारांनी दिलेल्या माहितीच्या आधारे हवेत गोळीबार करणे हा युवराजांचा आवडता उद्योग बनला आहे.

या आरोपानंतर युवराजांनी निवडणूक आयोगावर काँग्रेस समर्थक मतदारांची नावे वगळल्याचा आरोप केला. या आरोपासाठी युवराजांनी सीएसडीएस लोकनीती या निवडणूक अंदाज वर्तविणाऱ्या संस्थेच्या आकडेवारीचा आधार घेतला. या संस्थेने रामटेक आणि देवळाली या विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीनंतर अनुक्रमे ३८ आणि ३६ टक्के मतदार कमी झाल्याचा आरोप केला होता. निवडणूक आयोगाने सीएसडीएस लोकनीतीचे सहसंस्थापक संजय कुमार यांना नोटीस पाठविल्यानंतर या संजय कुमारांनी आपण चुकीच्या माहितीच्या आधारे सदर आरोप केल्याचे मान्य करत निवडणूक आयोगाची बिनशर्त माफी मागितली. निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदवणे, मतदाराचे नाव वगळणे, मतदार यादीतील पत्त्यामध्ये दुरुस्त्या करणे यासारख्या प्रक्रियेत अनेक वर्षांपासून चुका होत आहेत. या चुका विशिष्ट पक्षाला मदत व्हावी, या हेतूने केलेल्या नसतात.

अलीकडेच युवराजांनी काँग्रेस समर्थक मतदारांची नावे निवडणूक आयोग जाणीवपूर्वक वगळत आहे, असा आरोप केला. हा आरोप करताना त्यांनी महाराष्ट्रातील राजुरा विधानसभा मतदारसंघाचा उल्लेख केला. या मतदारसंघात विधानसभा निवडणुकीआधी जवळपास सात हजार मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली आणि काँग्रेस उमेदवाराचा तीन हजार ५४ मतांनी पराभव झाला, असा युवराजांचा आरोप होता. या मतदारसंघाचे भाजप आमदार देवराम भोंगळे यांनी या मतदारसंघात असे काही घडलेच नाही, किंबहुना भाजपलाच निवडणुकीआधी बोगस मतदारांची नावे समाविष्ट केली जातील, असा संशय असल्याने अशा आशयाची तक्रार करण्यात आल्याचे पुराव्यानीशी दाखवून दिले. मुळात जिथे मतदार कमी केले हा राहुल यांनी आरोप केला, त्या कर्नाटकमधील आळंदमध्ये कॉंग्रेसचाच उमेदवार विजयी झाला. आळंद येथे कॉंग्रेसच्या मजबूत बूथमध्ये म्हणे टारगेट करून मते हटवली गेली. पण तसे असते तर कॉंग्रेसचा उमेदवार विजयी झाला असता का? हटवलीच असती तर पराभवच झाला असता ना! तसेच जिथे मतदार समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप राहुल यांनी केला त्या राजुरा येथे कॉंग्रेसच्या मतांमध्ये मागील निवडणुकीच्या तुलनेत नऊ हजारांनी वाढ झाली. त्यामुळे आरोप करण्याआधी विषयाचा किमान अभ्यास करावा, असेही राहुल यांना वाटले नाही. स्वतःच स्वतःच्या आरोपांचे हसे करून घेतले.

राजुरा मतदारसंघात बोगस नावे समाविष्ट केल्याचा आरोप राहुल यांनी केल्यानंतर एका पत्रकाराने युवराजांना तुमच्याकडे एवढे भक्कम पुरावे असताना तुम्ही न्यायालयात का जात नाही? असा प्रश्न केल्यावर युवराज गडबडले. न्यायालयात जाणे हे माझे काम नाही. ते काम तरुणपिढी करेल, असे हास्यापद उत्तर युवराजांनी दिले. एकूणात काय तर युवराजांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी खोट्याचा आधार घ्यावा लागतो आहे; मात्र यातून ते राजकारणातील 'स्टँडअप कॉमेडियन' बनत चालले आहेत, हे मात्र नक्की.

# 'चंद्रघंटा' आकर्षण वाढविणारी देवी

दुर्गेच्या तिसऱ्या शक्तीचे नाव 'चंद्रघंटा' आहे. नवरात्रीच्या तिर्सया दिवशी या देवीची पूजा केली जाते. तसेच संकट निवारणासाठी देखील या दिवशी पूजा केली जाते. या दिवशी साधकाचे मन 'मणिपूर' चक्रात प्रविष्ट होते. चंद्रघंटेच्या कृपेने अलौकिक वस्तूचे दर्शन होते. दिव्य सुगंधाचा अनुभव येतो किंवा विविध प्रकारचा दिव्य आवाज ऐकायला येतो. हे क्षण साधकासाठी अत्यंत सावधान राहण्यासाठी असतात. देवीचे हे रुप परम शांतिदायक आणि कल्याणकारी आहे. तिच्या मस्तकावर घंटेच्या आकाराचा अर्धचंद्र असल्यामुळे तिला 'चंद्रघंटा देवी' असे म्हटले जाते. शरीराचा रंग सोन्यासारखा चमकणारा आहे. या देवीला दहा हात आहेत. या दहा हातामध्ये खड्ग, धनुष्यबाण आदी शस्त्रे आहेत. तिचे वाहन सिंह असून मुद्रा नेहमी युद्धासाठी तयार असते.

माँ चंद्राघंटाच्या कृपेने भक्तांचे सर्व पाप आणि संकट दूर केले जाते. माँ भक्तांच्या संकटाचे निवारण लगेच करते. तिचा उपासक सिंहाप्रमाणे पराक्रमी आणि निर्भय होतो. तीच्या घंटेच्या आवाज प्रेतबाधेपासून भक्तांचे रक्षण करतो. या देवीच्या चरणी शरणागती पत्करल्यास घंटेचा आवाज निनादतो. या माँ देवीचे रुप अत्यंत सौम्य व शांतिपूर्ण आहे. या देवीची आराधना केल्यास विरता-निर्भयता बरोबर सौम्यतेचा विकास होवून संपूर्ण शरीरात कांती-गुणांची वाढ होते.

आवाजात मधुरता येते. माँ चंद्राघंटाचे भक्त आणि उपासक जेथे जातात तेथील लोक त्यांना पाहून शांती आणि सुखाचा अनुभव करतात. आपण आपले मन, वचन, कर्म हे पवित्र करुन देवीची उपासना करण्यासाठी तयार व्हा. तिची उपासना केल्यामुळे सर्व सांसारिक संकटातून मुक्ती मिळते. आपण नेहमी तिची उपासना करण्यासाठी अग्रेसर असावे. इहलोक आणि परलोक दोन्हीच्या कल्याणकारी आणि समृद्धीसाठी तिचे लक्ष आहे.

नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी देवीच्या चंद्रघंटा या रुपाची आराधना केली जाते. या रुपांमध्ये देवीला चंद्राच्या आकाराच्या घंटांनी युक्त दागिने परिधान करतात. चंद्राचा संबंध मानवी मनाशी आहे आणि घंटेचा ध्वनी मनाला त्वरित वर्तमान क्षणात घेऊन येते. चंद्राच्या कलांप्रमाणे मन देखील सतत आकुंचित प्रसारित होत असते. देवीच्या या रूपाच्या नामोच्चार मात्रे आपले मन सजग होऊन आपल्या नियंत्रणात येते.

जेव्हा सजगता आणि खंबीरपणा हे गुण वाढू लागतात तेव्हा आपले मन, आपले व्यक्तिमत्त्व आकर्षक बनते. चंद्रघंटा ही मनाच्या या आकर्षकतेचे प्रतीक आहे.



# नवरात्रीत कन्यापूजन केल्याने मिळते सुख-समृद्धी, धनसंपत्ती व देवीची कृपा, पहा कन्यापूजनाची विधी, महत्व आणि फायदे...!

नवरात्रीत देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. नवरात्रीचे व्रत केले जातात. अगदी एकभुक्त राहून ते केवळ पाण्यावर व्रत करणारे देखील भक्त पहायला मिळतात. यामागे एकच कारण असते ते म्हणजे आपली आदिमाया शक्ती भगवती आपल्यावर प्रसन्न व्हावी. देवीला नवरात्रीत खुश करण्यासाठी भाविक अनेक उपाय करतात.आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी देखील देवीकडे साकडे घालण्यात येते. अशातच या नवरात्रीत कन्यापूजन करण्याची देखील पद्धत आहे. देवी दुर्गाच्या या नवरात्रीला स्त्रीशक्तीला समर्पित करण्यात आले आहे. त्यामुळे या नऊ दिवसांमध्ये जर आपण कन्यांचे पूजन केले तर देवी प्रसन्न होते असे मानतात/ त्यामुळे पाहुयात नवरात्रीत कन्यापूजनाचे महत्व आणि फायदे काय आहेत? कसे करावे कन्यापूजन चला जाणून घेऊयात...

कन्या पूजनाचे महत्व

कन्या पूजनाचे नवरात्रीत अत्यंत महत्व आहे. कन्यांना देवीचे स्वरूप मानले जाते. त्या कन्यांचे पूजन करणे म्हणजे साक्षात देवीचे पूजन केल्यासमान पुण्य मिळते असे मानतात. कन्यांना देवीचे रूप मानून त्यांचे पूजन करून त्यांना साजशृंगार दिला जातो. दक्षिणा दिल्या जातात व प्रसाद देखील खाऊ घातला जातो. निरागस कन्यांच्या रूपात नवदुर्गा आपल्या घरात येतात व आशीर्वाद देऊन जातात अशी मान्यता असल्याने नवरात्रीत कन्यापूजनाला विशेष महत्व आहे.

किती कन्यांचे पूजन करावे

नवरात्रीत कन्यापूजनला अत्यंत महत्व आहे. याकाळात तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार कन्यापूजन करू शकता. मात्र शास्त्रोक्त पद्धतीत नऊ कन्यांचे पूजन करण्याची मान्यता आहे. या नऊ कन्या देवीची नऊ रूपे मानली जातात. त्यामुळे कन्यापूजनात नऊ कन्या असाव्यात. या सर्व मुली २ वर्षे ते १० वर्षांपर्यंत असाव्यात असे सांगितले जाते.

कन्यापूजन कसे करावे

कन्यापूजनात नऊ कन्या असाव्या लागतात. नवरात्रीतील कोणत्याही दिवशी तुम्ही कन्यापूजन केले तरी चालते. मात्र अष्टमी किंवा नवमीला कन्यापूजन करण्याची पद्धत आहे. यादिवशी



नऊ कन्यांना आपल्या घरी बोलवा. त्यांना बसण्यासाठी आसन द्यावे. त्यांचे पाय धुवावेत. मग त्यांना हळद कुंकू लावावे.

गजरा द्यावा. साजशृंगाराचे सामान कन्यांना द्यावे. त्यानंतर देवीला नमस्कार करून सर्व कन्यांना भोजन द्यावे. यामध्ये काळे चणे पुरी आणि शिरा किंवा खिरीचा नैवेद्य दाखवण्याची पद्धत आहे. मात्र तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार भोजन करावे मात्र त्यात गोड पदार्थ अवश्य असायला हवा. यानंतर सर्व कन्यांना आपल्या क्षमतेनुसार दक्षिणा द्यावी. सर्व कन्यांना शेवटी नमस्कार करावा.

# नवरात्रीत अनवाणी चालण्याचे शास्त्र, श्रद्धा आणि आरोग्याचा मंत्र

नऊ दिवस देवी दुर्गेच्या विविध रुपांची पूजा करून सामर्थ्य आणि शक्तीची आराधना केली जाते. या उत्सवात अनेक भाविक पायात चप्पल न घालता अनवाणी चालण्याची प्रथा पाळतात. पण ही परंपरा नेमकी का पाळली जाते, तिच्यामागे धार्मिक तसेच आरोग्यदायी कारणं कोणती आहेत, हेच आपण या लेखातून जाणून घेणार आहोत.

अनवाणी चालण्यामागे धार्मिक आणि वैद्यकीय महत्व : नवरात्रीत केवळ महिला नव्हे तर काही पुरुष मंडळीदेखील नऊ दिवस पायात वाहना घालत नाही.

नावरात्रोत्सवात अनवाणी चालण्याची पद्धत खूपच जुनी आहे. पण हिंदू सणांची खासियत म्हणजे हे सण केवळ धार्मिक नव्हे तर वैद्यकीय कारणांमुळे देखील साजरे करणे महत्वाचे मानले जाते.

धार्मिक महत्व : नवरात्रीमध्ये सर्वत्र धार्मिक वातावरण निर्माण झालेले असते. यादरम्यान देवी दुर्गेचा वावर पृथ्वीतलावर होत असतो, असे मानले जाते. तसेच आपण जेव्हा कधी मंदिरात तसेच एखाद्या पवित्र जागेत प्रवेश करताना, अशुद्धता आणि मानसिक ओझे मागे सोडून देण्यासाठी पायातले शूज बाहेर काढतो. मंदिरात तसेच घरात चप्पल काढूनच प्रवेश केला जातो, मुळात पूवार्पार चालत आलेल्या या जुन्या परंपरेमुळे परिसर स्वच्छ करण्याची आणि पर्यावरणाशी संबंध जोडण्याची संधी माणसांना मिळते.

वैद्यकीय महत्व : अनवाणी चालणे केवळ धार्मिक श्रद्धेपुरते मर्यादित नाही, तर त्याला शास्त्रीय आधार देखील आहे. पायाच्या तळव्यांमध्ये ऍक्युपंक्चर पॉइंट्स असतात जे शरीरातील महत्त्वाच्या अवयवांशी जोडलेले असतात. जमिनीचा थेट स्पर्श झाल्याने शरीरातील ऊर्जा संतुलित राहते, रक्ताभिसरण सुधारते, तणाव कमी होतो, उच्च रक्तदाब नियंत्रणात येतो, हृदयविकाराचा धोका घटतो आणि हाडं मजबूत होतात.

नवरात्रीत अनवाणी चालण्याची प्रथा कधी आणि कशी सुरू झाली?

नवरात्रीत अनवाणी चालण्याची सुरुवात घटस्थापनेच्या प्रथेपासून सुरू झाली आहे. यादरम्यान घटाभोवती माती टाकली जाते, आणि त्यात धान्याची रुजवण केली जाते. ज्यामुळे मातीचा स्पर्श होऊन भक्तांना निसगार्शी जोडण्यास ही प्रथा मदत करते. मातीशी नाळ जोडली जावी आणि मातीशी आपला ऋणानुबंध कायम राहावा, या हेतूने भाविक नवरात्रीत चप्पला घालत नाहीत.

अनवाणी चालण्याचे आरोग्य फायदे जाणून घेऊयात : पायांचे स्नायू मजबूत होतात - पायात चप्पल किंवा बूट नसल्यामुळे पायाच्या तळव्यांवर नैसर्गिक दाब येतो. यामुळे पायातील लहान-मोठ्या स्नायूंना व्यायाम मिळतो, स्नायू अधिक लवचिक होतात आणि संतुलन सुधारते. दीर्घकाळात पायातील वेदना, सूज किंवा थकवा कमी होण्यास मदत होते.

तणाव कमी करण्यास उपयुक्त - अनवाणी चालताना मिळणाऱ्या नैसर्गिक स्पशार्मुळे चिंता आणि ताण कमी होतो, ज्यामुळे दिवस अधिक ऊजार्युक्त आणि आनंदी वाटतो.


चांगली झोप लागते - अनवाणी चालल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरातील ऊर्जा संतुलित होते. यामुळे रात्री शरीराला पुरेशी विश्रांती मिळून गाढ आणि आरामदायी झोप लागते. नियमितपणे बागेत किंवा मोकळ्या जागेत अनवाणी चालणाऱ्या लोकांना झोपेच्या समस्या कमी जाणवतात.

# नवरात्रीतील नऊ रंगांचे महत्व काय?

नवरात्रोत्सवात देवी दुर्गाच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. त्याचसोबत व्रतवैकल्य देखील केले जातात. हिंदू धमार्तील हा अतिशय मोठा उत्सव मानला जातो. नवरात्रीत देवीच्या व्रत आणि पूजेसोबतच गरबा दांडिया देखील खेळले जातात. गरबावर पारंपरिक नृत्य केले जाते. असा हा उत्सव आणखी एका गोष्टीसाठी ओळखला जातो ती म्हणजे नवरात्रीतील रंग. नवरात्रोत्सवात प्रत्येक दिवशी एक रंग परिधान केला जातो. यंदा नवरात्रीत कोणत्या दिवशी कोणता रंग आहे हे जाणून घेऊयात.

नवरात्रीतील रंगाचे महत्व

नवरात्रोत्सव आला की महिला विशेष करून अति उत्साही पहायला मिळतात. कारण नवरात्रीतील नऊ रंग याकाळात परिधान करण्यासाठी त्या आतुर असतात. नवरात्रीत एक विशिष्ठ रंग वेगवेगळ्या दिवशी घातला



जातो. नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीला समर्पित असल्याने याकाळात विविध रंग परिधान करून स्त्रीशक्तीच्या रुपांना गौरविण्यात येते. नवरात्रीच्या रंगांना शास्त्रोक्त किंवा धार्मिक महत्व नाही. गेल्या काही वर्षांपासून नवरात्रीत विविध रंग घालण्याची प्रथा सुरु झाली आहे. सर्वज ही प्रथा अगदी आनंदाने फॉलो करताना दिसतात. त्यामुळे दरवर्षी नवरात्रोत्सव जवळ आला की रंगांची जमवाजमव सुरु होते.

नवरात्रीच्या कोणत्या दिवशी कोणता रंग

सप्टेंबर 22, 2025, सोमवार : पांढरा
सप्टेंबर 23, 2025, मंगळवार : लाल
सप्टेंबर 24, 2025, बुधवार : निळा
सप्टेंबर 25, 2025, गुरुवार : पिवळा
सप्टेंबर 26, 2025, शुक्रवार : हिरवा
सप्टेंबर 27, 2025, शनिवार : करडा
सप्टेंबर 28, 2025, रविवार : नारिंगी
सप्टेंबर 29, 2025, सोमवार : मोरपंखी
सप्टेंबर 30, 2025, मंगळवार : गुलाबी

# सूर्य आज गोचर करणार कन्या राशीत, पुढील 30 दिवसांत काय प्रभाव पडणार देश दुनियावर..!

सूर्य जेव्हा एका राशीतून दुसऱ्या राशीत जातो तेव्हा ज्योतिषाशास्त्रात त्याला 'सूर्य गोचर' म्हणतात. आज सूर्य कन्या राशीत प्रवेश करणार आहे. मेदिनी ज्योतिषानुसार सूर्य राशी बदलतो तेव्हा एक विशेष कुंडली तयार होते. या कुंडलीला 'सूर्य संक्रांती कुंडली' म्हणतात. सूर्य एका राशीत सुमारे ३० दिवस राहतो. त्यामुळे या कुंडलीचा अभ्यास करून त्या महिन्यातील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घटनांचा अंदाज लावला जातो.

येत्या १७ सप्टेंबरला रात्री १ वाजून ४७ मिनिटांनी सूर्य कन्या राशीत प्रवेश करेल. त्या वेळी भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाची एकादशी असेल. 'भविष्यफल भास्कर' नावाच्या ज्योतिष ग्रंथात सांगितले आहे की जर कन्या संक्रांती मंगळवारी आली तर रोगांचे भय असते. तसेच ऊस आणि धान्याच्या किंमती वाढू शकतात.

या वर्षी सूर्य कन्या राशीत प्रवेश करेल तेव्हा तो शनीच्या दृष्टीने बाधित असेल. शनी मीन राशीत आहे आणि सूयार्पासून सातव्या घरात आहे. यामुळे 'समसप्तक' नावाचा अशुभ योग तयार होईल. या योगामुळे राजांमध्ये भांडणे होतील आणि अनेक देशांमध्ये जन-आंदोलने होण्याची शक्यता आहे. कन्या राशीतील शनी वक्री आहे म्हणजे तो उलटा फिरत आहे. शनीच्या या स्थितीमुळे इजराइल आणि रशिया या दोन्ही देशांमधील तणाव वाढू शकतो. त्यांची आक्रमकता वाढण्याची शक्यता आहे.

भारतावर सूर्य गोचरचा परिणाम

भारताच्या दृष्टीने विचार केल्यास सूर्य संक्रांतीच्या वेळी कर्क लग्न उदित होत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नवव्या भावात वक्री शनी आठव्या भावाचा स्वामी होऊन बसला आहे. यामुळे सूर्य आणि शनी यांच्यात अशुभ संबंध निर्माण होईल. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या एखाद्या मोठ्या निर्णयामुळे सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यात वाद वाढू शकतो.

निवडणूक आयोग भाकीत


भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी दिल्लीत झाली. निवडणूक आयोगाची जी कुंडली आहे ती तुळ लग्नाची आहे. या कुंडलीमध्ये लग्न (तूळ) नवमांशामध्ये वर्गोत्तम आहे. वर्गोत्तम म्हणजे कुंडलीतील ग्रहांची स्थिती खूप मजबूत आहे. तसेच कुंडलीच्या केंद्रामध्ये शुभ ग्रह (गुरू आणि शुक्र) असल्यामुळे या संस्थेची प्रतिमा निष्पक्ष निवडणूक घेण्यासाठी जगभर ओळखली जाते.

परंतु, मागील काही वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या स्थापनेच्या कुंडलीमध्ये अडचणी दिसत आहेत. आयोगाच्या सहाव्या भावात राहुची महादशा (जुलै २००५ ते जुलै २०२३ पर्यंत) चालू होती. त्यामुळे आधी भाजपाने आणि नंतर काँग्रेसने निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन (एव्हट) मध्ये गडबड असल्याचा आरोप निवडणूक आयोगावर केला.

गेल्या दोन वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या स्थापनेच्या कुंडलीत नीच गुरूची महादशा चालू आहे. त्यामुळे विरोधी पक्ष सत्ताधारी बीजेपीच्या सांगण्यावरून मतदार याद्यांमध्ये गडबड करत असल्याचा आरोप करत आहेत. निवडणूक आयोगाच्या कुंडलीमध्ये दशमेश चंद्र अडचणीच्या सहाव्या भावात राहू सोबत आहे. त्यात शनीची दृष्टी असल्यामुळे मतदार यादीतील वाद वाढण्याची शक्यता आहे असे ज्योतिषीय संकेत आहेत.

डोनाल्ड ट्रम्पला नोबेल पुरस्कार मिळण्याची शक्यता

दरवर्षी ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात नोबेल पुरस्कारांची घोषणा केली जाते. यावर्षी १० ऑक्टोबरला पुरस्कारांची घोषणा होणार



आहे. त्यानंतर १० डिसेंबरला नॉर्वे देशातील ओस्लो शहरात एका मोठ्या कार्यक्रमात हे पुरस्कार दिले जातील. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जगातील पाच राष्ट्रप्रमुखांनी नोबेल शांती पुरस्कारासाठी नामांकित केले आहे. आर्मेनिया आणि अझरबैजानच्या राष्ट्रप्रमुखांनी ८ ऑगस्ट रोजी दोन्ही देशांमधील तीन दशकांपासून सुरू असलेला सीमावाद मिटवल्याबद्दल ट्रम्प यांना नोबेल शांती पुरस्कारासाठी नामांकित केले.

इस्त्रायल आणि थायलंडच्या अध्यक्षांनीही डोनाल्ड ट्रम्प यांना या पुरस्कारासाठी नामांकित केले आहे. पाकिस्तानने मे महिन्यात भारतासोबतचा लष्करी संघर्ष वाढू नये यासाठी प्रयत्न केल्याबद्दल ट्रम्प यांना नोबेल शांती पुरस्कारासाठी आपल्या देशाकडून नामांकित केले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या जन्मकुंडलीनुसार (जन्मः १४ जून १९४६, सकाळी १० वाजून ५२ मिनिटे, न्यूयॉर्क शहरातील क्वीन्स येथे), त्यांच्या कुंडलीत सध्या गुरूची महादशा चालू आहे. गुरू त्यांच्या कुंडलीतील धन स्थानात आहे. या महादशेत शुक्र ग्रहाची अंतर्दशा आणि त्यात राहूची प्रत्यंतर दशा १९ सप्टेंबर २०२५ ते ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत असणार आहे. राहू दशम भावात (केंद्र स्थान) आपल्या मित्र राशीत (वृषभ) आहे. तो लग्नेश सूयार्सोबत युती करत आहे आणि पंचमेश गुरूची दृष्टी त्याच्यावर आहे. यामुळे एक मोठा राजयोग तयार होत आहे. नवमांश कुंडलीमध्ये राहूला योगकारक शनीची दृष्टी आहे ज्यामुळे तो आणखी शक्तिशाली बनत आहे. राहूच्या या शुभ प्रत्यंतर दशेत डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल शांती पुरस्कार मिळू शकतो असे सांगितले जातेय.

# नवरात्रीच्या काळात मासिक पाळी आल्यास काय करावे?



नवरात्रीत नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. या काळात व्रत, उपवास करण्याला विशेष महत्त्व आहे. या काळात अनेकजण आपल्या घरात कुलदेवीचे घट बसवतात. पण नवरात्रीत अचानक मासिक पाळी येते, मग अशा वेळी नेमके काय करावे? असा संभ्रम असतो. खरे तर, मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण नवरात्रीत मासिक पाळी आली तर काही नियम पाळणे गरजेचे आहे.

नवरात्रीच्या काळात मासिक पाळी सुरू झाल्यास महिलांनी पहिले चार दिवस देवघराजवळ जाणे किंवा पूजा साहित्याला स्पर्श करणे टाळावे. तसेच मासिक पाळीदरम्यान देवीला नैवेद्य अर्पण करणे देखील टाळावे. पण या काळात महिला उपवास करू शकतात. तसेच घरच्या घरी मनोभावे देवीची प्रार्थना करू शकतात. मासिक पाळीच्या पाचव्या दिवसापासून महिला पुन्हा पूजा करू शकतात.

कन्या पूजन आणि हवनाचे नियम


काही महिलांना चार दिवसांपेक्षा जास्त दिवस रक्तस्त्राव होत असतो. मग अशा वेळी महिलांनी स्वतः कन्यापूजन करू नये किंवा हवनात सहभागी होऊ नये. अशा परिस्थितीत घरातील सदस्यांकडून कन्यापूजन करून घ्यावे.

जर घरात कन्यापूजन किंवा हवन करण्यासाठी कोणी नसेल तर नवरात्रीऐवजी पौर्णिमेच्या दिवशी हे कार्य करता येऊ शकते. अशाप्रकारे, नवरात्रीच्या काळात मासिक पाळी आल्यास उपवास करता येतो. पण पूजा करणे टाळावे.

# सिद्धिविनायक मंदिराच्या सुशोभिकरणासाठी मुंबई महापालिकेने मागवल्या निविदा; पहिल्या टप्प्यातील कामांसाठी ७८ कोटी खर्च...

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना वाढीव सुविधा देण्याकरीता राज्य सरकारच्या निदेर्शानुसार मुंबई महानगरपालिकेने विशेष प्रकल्प हाती घेतला असून यातील पहिल्या टप्प्यातील कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. सुमारे ७८ कोटींच्या कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मंदिर भारतातील प्रमुख देवस्थानांपैकी एक धार्मिक स्थळ आहे. सिद्धीविनायकाच्या दर्शनासाठी या मंदिरात जगभरातून लाखोंच्या संख्येने भाविक येतात. अनेक सुप्रसिद्ध व्यक्ती, अभिनेते, अभिनेत्री, उद्योजक गणपतीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. मात्र अत्यंत गजबजलेल्या या परिसरात लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे मंदीर परिसराचा कायापालट करण्याचा प्रकल्प महापालिका प्रशासनाने हाती घेतला आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांनी सागरी मार्गाच्या एका मार्गिकेच्या लोकार्पण कार्यक्रमात सिद्धीविनायक मंदिराच्या प्रकल्पाची घोषणा केली होती. तसेच या प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपये निधी देण्याचीही घोषणा केली होती. या प्रकल्पांतर्गत सिद्धीविनायक मंदिर परिसराचे सुशोभिकरण आणि पुनर्नियोजन करण्यात येणार आहे. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण, सुशोभिकरण, पूजा साहित्य विक्रेत्यांची बसण्याची व्यवस्था अशा कामांचा यात समावेश आहे. या कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट) तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सल्लागारांनी सुचवल्यानुसार आता मुंबई महापालिकेने पहिल्या टप्प्यातील कामांसाठी निविदा मागवल्या आहेत. पहिल्या टप्प्यात भूमिगत वाहनतळ, मंदिराचे प्रवेशद्वार, लादीकरण, छताचे काम, संरक्षक भिंत आदी कामे केली जाणार आहेत. भूमिगत दोन तळमजल्यांचे वाहनतळ तयार करण्यात येणार आहे. या कामांचा अंदाजित खर्च ७८ कोटी रुपये असून या कामासाठी मुंबई महापालिकेने आता निविदा मागवल्या आहेत. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागारांनी दिलेल्या विस्तृत अहवालावर निर्णय घेण्यासाठी पालिकेच्या परिमंडळ २ चे उपायुक्त आणि सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. यात मुंबई महापालिकेच्या जी उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त, जी दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त, पालिकेचे वास्तुविशारद, पालिकेच्या विकास नियोजन विभागाचे प्रमुख अभियंता, रस्ते व वाहतूक विभागाचे प्रमुख अभियंता, नगर उप अभियंता विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

# एसी लोकलच्या टपावर चढला तरूण; क्षणात होत्याचं नव्हत झालं; दिवा स्थानकावरील घटना!

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

सकाळी दिवा स्थानकाजवळ एसी लोकल ट्रेनच्या छतावर चढलेला तरूण ओव्हरहेड वायरच्या संपर्कात आल्यानंतर गंभीर जखमी झाला. तरुणाला तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णवाहिकेतून कळवा येथील शिवाजी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्याची सध्याची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना एसी लोकल ट्रेन क्रमांक ङ/25 मध्ये घडली. मिळालेल्या माहितीनुसार, ही लोकल सकाळी १० वाजताच्या सुमारास दिवा स्थानकावर येत असताना संबंधित तरूण कोच क्रमांक १९८७१६ सीआरच्या



छतावर बसलेला दिसला. लोकल दिवा स्थानकात येताच त्या तरुणाने खाली उतरण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो हाय व्हॉल्टेज ओव्हरहेड वायरच्या संपर्कात आला. त्यामुळे त्याला वीजेचा धक्का बसला आणि गंभीररित्या भाजला.

या घटनेबाबत माहिती मिळताच रेल्वे पोलीस जे.के. वर्मा (उपनिरीक्षक), शिवकुमार मीना (सहाय्यक उपनिरीक्षक) आणि स्टेशन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर जखमी तरुणाला छतावरून खाली उतरण्यात आले. जखमी तरुणाला तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णवाहिकेतून कळवा येथील शिवाजी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची सध्याची प्रकृती चिंताजनक आहे.

रेल्वे वाहतूक तात्पुरती विस्कळीत झाली, २६ मिनिटांच्या विलंबानंतर सकाळी १०:३८ वाजता लोकल पुन्हा सुरू झाली. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना अशा धोकादायक आणि बेकायदेशीर कृत्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. ट्रेनच्या छतावर प्रवास करणे हा केवळ धोकादायक नाही, तर रेल्वे कायद्यानुसार तो एक गंभीर गुन्हा आहे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# चोराच्या हल्ल्यात डॉक्टरने गमावला हात... तीन महिन्यांनी आरोपीला केरळमधून अटक



■ **मुंबई। प्रतिनिधी:**

जून महिन्यात नांदेड विशेष ट्रेनमध्ये एका डॉक्टर दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला करून लुटणाऱ्या कुख्यात चोराला केरळ पोलिसांनी अटक केली. या हल्ल्यात पनवेलमधील ५० वर्षीय डॉक्टर देशमुख यांना आपला एक हात गमवावा लागला होता.

आरोपीला पुढील तपासासाठी कुर्ला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. डॉ. योगेश देशमुख (५०) आणि डॉ. दिपाली देशमुख (४४) दाम्पत्य पनवेल येथे राहतात. डॉ. देशमुख यांचे पनवेलच्या कामोठे येथे सदगुरू कृपा आयुर्वेद रुग्णालय आहे. देशमुख दाम्पत्य आणि ९ वर्षांची मुलगी श्रध्दा असे तिघे बुधवार, ४ जून २०२५ रोजी नांदेड येथे नातेवाईकाकाडे जाण्यासाठी निघाले होते. लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला टर्मिनस) येथून त्यांनी रात्री १ वाजता सुटणारी एलटीटी झ नांदेड विशेष ट्रेन पकडली. तिघे एस-४ बोगीत चढले होते. डॉ. दिपाली देशमुख मधल्या बर्थवर होत्या. त्यांचे पती डॉ. योगेश वरच्या बर्थवर आणि मुलगी श्रध्दा समोरील बर्थवर झोपली होती. त्यावेळी एक अनोळखी इसम ट्रेनमध्ये शिरला. मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास त्याने डॉ. दिपाली देशमुख यांच्या खाद्यावरील पर्स खेचण्याच्या प्रयत्न केला. त्याला डॉ. दिपाली यांनी प्रतिकार केला. या खेचाखेचीत त्या अनोळखी व्यक्तीने त्यांना डब्याच्या खाली खेचले आणि त्या ट्रेनखाली खाली पडल्या. तो गोंधळ पाहून डॉ. योगेश उठले पण पत्नी खाली पडल्याचे बघताच त्यांनी ट्रेनमधून खाली उडी मारली.

# सफाळ्यातील कुलाई देवी मंदिरात नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरूवात

■ **सफाळे । प्रतिनिधी:**

नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरूवात झाली असून सफाळेतील कुलाई देवी मंदिरातही भाविकांची गर्दी होत आहे. मंदिर पंचक्रोशीत प्रसिध्द असून नवरात्रीत येथे भाविकांची मोठी गर्दी उसळते. पालघर जिल्ह्यातीलच नव्हे तर मुंबई, ठाणे, विरार, वसई, बोईसर, बदलापूर आदी भागांतून महिला, पुरुष, लहानांपासून मोठ्यांपर्यंत हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. पालघर जिल्ह्यातील प्रसिद्ध दुगार्देवी मंदिरे श्री ग्रामदेवी कुलाई विश्वस्त मंडळ सफाळे आयोजित नवरात्री उत्सव दरवर्षी दिमाखात पार पडतो. मंदिरात दुगार्देवीची चांदीची मूर्ती मांडून घटस्थापना केली



जाते. दुगार्माता व कुलाई देवीच्या पुजा-अर्चा, आरत्या, गरबा नृत्य, हळदी-कुंकू, भजन-कीर्तन, फॅन्सी ड्रेस स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांतून वातावरण भक्तिमय होते. उत्सवाचे आयोजन पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांच्या सहकार्याने सुरळीत पार पडते.

कुलाई देवीविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. या देवीची चार नावे सांगितली जातात. सफाळेतील कुलाई देवी, राजस्थानातील किरवली देवी, रामेश्वरातील कन्याकुमारी,हिमालयातील सुवर्ण लंकेश्वरी देवी.गावकर्यांच्या सांगण्यानुसार, सुमारे शंभर वर्षांपूर्वी सरतोडी (सफाळे) येथील सामंत बाबार्डेकर घराण्यातील एका भक्ताला दृष्टांत झाला. सरतोडीपासून काही अंतरावर देवी वृक्षाजवळ वास्तव करत असल्याचे त्याला जाणवले. त्यानंतर सामंत आणि पाटील कुटुंबांनी चैत्र वद्य पंचमीला देवीची मूर्ती विवरातून बाहेर काढून स्थापिली. त्या दिवसापासून येथे भव्य यात्रा भरू लागली. भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारी ह्यनवसाला पावणारीह्ल देवी म्हणून तिची कीर्ती दूरवर पसरली.दरवर्षीप्रमाणे यंदाही देवीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील तसेच बाहेरगावच्या भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

# धावत्या ट्रेनमध्ये दरोडेखोराशी झटापटीत मुंबईतील डॉक्टरने हात गमावला



■ **मुंबई। प्रतिनिधी:**

नांदेड एक्सप्रेसमधून प्रवास करताना दरोडेखोराशी झालेल्या झटापटीत मुंबईतील एका डॉक्टरने हात गमावल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. ४ जून रोजी पहाटे ३.५० च्या दरम्यान कांजूरमार्ग रेल्वेस्टेशनजवळ घडलेल्या या घटनेप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी दरोडेखोर सैफ चौधरी याला अटक केली असून त्याने केरळमध्ये देखील अशाच चोऱ्या केल्याचं तपासात उघड झालं आहे. डॉ. योगेश देशमुख (५०) व डॉ. दीपाली देशमुख (४४) हे दोघे त्यांच्या नऊ वर्षांच्या मुलीबरोबर एलटीटी-नांदेड ट्रेनने लातूरला जात होते. लोकमान्य टिळक टर्मिनसवरून पहाटे ३.३० वाजता त्यांनी ट्रेन पकडली. देशमुख कुटुंब लातूरला एका लग्नासाठी जात होतं. दीपाली या मधल्या बर्थवर तर, त्यांचे पती योगेश हे वरच्या बर्थवर आराम करत होते. १५ मिनिटांनी ट्रेन भांडूप व कांजूरमार्ग स्थानकांच्या दरम्यान असताना एक इसम दीपाली यांच्या बर्थजवळ आला आणि त्याने दीपाली यांनी खांद्याला अडकवलेली पर्स खेचली. मात्र, दीपाली यांनी पर्स सोडली नाही. चोर पर्सबरोबर दीपाली यांना फरफटत ट्रेनच्या दरवाजापर्यंत घेऊन गेला. हा गोंधळ ऐकून योगेश झोपेतून जागे झाले आणि पत्नीला वाचवण्यासाठी धावले. मात्र, कांजुरमार्गजवळ ट्रेनचा वेग कमी झाला. त्याचवेळी चोराने पर्सला हिसका दिला अन् त्याने ट्रेनमधून उडी मारली.

# ७५ वर्षांचे ज्येष्ठ 'विद्यार्थी' परीक्षेला सामोरे जातात तेव्हा...; पाच हजार ६९७ प्रौढ व्यक्तींनी दिली परीक्षा

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

साडेतीन ते चार वर्षांच्या मुलाने शालेय जगात पाऊल ठेवल्यापासून त्याला उच्चशिक्षित होईपर्यंत विविध परीक्षांना सामारे जावे लागते. मुंबई महानगरात रविवारी ७५ वर्षांच्या 'ज्येष्ठ' विद्यार्थ्यांसह पाच हजार ६९७ प्रौढ व्यक्ती परीक्षेला सामोरे गेले. निमित्त होते ते साक्षरता परीक्षेचे.

निरक्षर व्यक्तींचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी सरकारकडून विविध पावले उचलण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रौढांना वाचन, लेखन आणि गणिताचे मूलभूत ज्ञान दिले जात आहे. या प्रौढांनी त्यापैकी किती ज्ञान आत्मसात केले, याची तपासणी करण्यासाठी साक्षरता परीक्षा घेतली जाते.

१५ वयाच्या पुढील निरक्षर व्यक्तींची परीक्षा मुंबईतील पालिकेच्या १२ अर्बन रिसर्च सेंटरमध्ये (यूआरसी) रविवारी पार पडली. केंद्र सरकारच्या उल्लास नवभारत ॲपवर मुंबई शहर भागात प्रत्यक्षात एकूण तीन हजार ४५८ प्रौढ व्यक्तींनी नोंद केली. त्यापैकी एक हजार ६६९ प्रौढ व्यक्तींनी साक्षरतेची परीक्षा दिली. तर उपनगरामध्ये पाच हजार ९१० परीक्षार्थींनी नोंद केली. त्यापैकी चार हजार २८



परीक्षार्थींनी परीक्षा दिली,अशी माहिती योजना विभागाने दिली. तर नोंद केलेल्यापैकी निम्म्या परीक्षार्थींनी परीक्षा दिलीच नसल्याचेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

मुंबई जिल्ह्यात नोंदणी केलेल्यांपैकी निम्मेच परीक्षार्थी या परीक्षेला बसल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना योजना विभागाने सांगितले की, अनेक परीक्षार्थींची तयारी झालेली नसते. त्यामुळे ते या टप्प्यात परीक्षेला बसत नाही. परंतु, मार्च २०२६ मध्ये ते परीक्षा देऊ शकतात.

नियमितपणे त्यांची तयारी शिक्षण विभागाकडून करून घेतली जाते. तर, परीक्षेचा निकाल या आठवड्यातच घोषित केला जाणार असल्याची माहिती योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी भावना राजनोर यांनी दिली.

मला शिक्षणाची आवड : गंभीर पटेल


अंधेरीतील मरोळ प्रागतिक मराठी शाळेत परीक्षा केंद्रावर ७५ वर्षांचे गंभीर पटेल यांनी आनंदाने परीक्षा दिली. या वयातही त्यांना अभ्यास करायला आवडतो. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केल्यामुळे परीक्षा देण्याइतपत तयारी झाल्याचे गंभीर पटेल यांनी सांगितले.

# मोबाईल आणि ब्रँडेड घड्याळांच्या दुकानात दरोडा; चार सराईत गुन्हेगारांना अटक!



■ **मुंबई। प्रतिनिधी:**

या महिन्याच्या सुरुवातीला अंधेरी पूर्वेतील एका मोबाईल आणि ब्रँडेड घड्याळांच्या दुकानात झालेल्या मोठ्या दरोड्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी चार सराईत गुन्हेगारांना अटक केली. आरोपींकडून फोन आणि रोख रक्कम यासह चोरीला गेलेली मालमत्तादेखील जप्त करण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही चोरी ८ सप्टेंबरच्या सुमारास घडली, जेव्हा अज्ञात लोकांनी दुकानात घुसून विविध ब्रँडच्या सुमारे १५० घड्याळे, १० मोबाईल फोन आणि रोख रक्कम पळवून नेली. तक्रारीनंतर, अधिकाऱ्यांनी तांत्रिक देखरेख आणि माहिती देणाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीचा वापर करून तपास सुरू केला. मुख्य आरोपी, ४६ वर्षीय मोइनुद्दीन नाझिम शेख याला प्रथम अटक करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, मुंब्रा येथील रहिवासी हा एक सराईत गुन्हेगार आहे. त्याचा जबाब नोंदवून तुर्भे आणि डोंगरी येथून त्याच्या तीन साथीदारांना अटक करण्यात आली. साबीर शेख (वय, ४०), डोंगरी येथील अमरुद्दीन अली हसन शेख (वय, ६०) आणि ऐरोली येथील प्रभू भागलू चौधरी (वय, ३०) अशी त्यांची नावे आहेत. मुंबई पोलिसांनी सांगितले की, साबीर शेखवर यापूर्वी दोन गुन्हे दाखल आहेत. तर, अमरुद्दीन अली हसन शेख आणि प्रभु भागलू चौधरी यांच्यावर यापूर्वी पाच इतर गुन्हे दाखल आहेत.



# बेकायदा फेरीवाल्यांना मनमानी पद्धतीने हटवता येऊ शकत नाही; कामाठीपुरा येथील फेरीवाल्यांवरून उच्च न्यायालयाचा निर्वाळा...

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

कामाठीपुरा परिसरातील बेकायदा फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देऊनही त्याची पूर्तता करण्यात महापालिका अपयशी ठरल्याचा दावा करणाऱ्या स्थानिकांची अवमान याचिका उच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळली. तसेच, फेरीवाल्यांनाही नागरी हक्क असून त्यांना मनमानी पद्धतीने हटवले जाऊ शकत नाही, अशी टिप्पणीही न्यायालयाने ही याचिका फेटाळताना केली. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार योग्य प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच महापालिका कारवाई करू शकते, असेही मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. एखाद्या व्यक्तीने बेकायदेशीरपणे एखाद्या जागेवर ताबा मिळवला, तरी त्याला कायद्याने काही नागरी हक्क प्राप्त होतात.

त्यामुळे, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय त्याला हटवता येऊ शकत नाही. ही बाब हे लक्षात घेता, कामाठीपुरा परिसरातील स्थानिकांनी महापालिकेविरुद्ध केलेली अवमान याचिका विचारात घेण्यास आम्ही तयार नाही, असे खंडपीठाने याचिका फेटाळताना स्पष्ट केले. कामाठीपुरा परिसरातील गल्ल्यांमधील बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने २१ डिसेंबर २०२३ रोजी महापालिकेला दिले होते. त्यासाठी याचिकाकर्त्यांनी बेकायदा फेरीवाल्यांवरील कारवाईबाबतचे निवेदन १५ दिवसांत महापालिकेकडे सादर करण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते. तथापि, महापालिकेकडे यासंदर्भात निर्धारित वेळेत संपर्क साधूनही, न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले गेले नाही. महापालिकेकडून बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची आम्ही तीन महिने वाट पाहिली. परंतु, त्यानंतरही महापालिकेने न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्याने अखेर पुन्हा न्यायालयात धाव घेऊन अवमान याचिका दाखल केल्याचे याचिकाकर्त्यांनी युक्तिवादाच्या वेळी न्यायालयाला सांगितले. हे बेकायदा फेरीवाले गेल्या सात ते दहा वर्षांपासून कामाठीपुरा येथील ना फेरीवाला क्षेत्रातील जागेवर व्यवसाय करत आहेत.

त्यांनी येथील अरूंद रस्ते, गल्ल्या पूर्णपणे अडवल्या आहेत. परिणामी, रहिवाशांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे, त्यामुळे, फेरीवाल्यांवर कारवाईचे आदेश देतानाच त्यांनी पुन्हा आपली दुकाने थाटू नयेत यासाठी देखरेख ठेवण्यासाठी पाळत ठेवणारी एक गाडी परिसरात उभी करण्याचेही याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले. याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादाची दखल घेऊन, फेरीवाले गेल्या सात ते दहा वर्षांपासून या ठिकाणी व्यवसाय करत आहेत आणि त्यांना तुम्ही तीन महिन्यांत हटवण्याची मागणी करत आहात, अशी विचारणा न्यायालयाने याचिकाकर्त्यांना केली. तसेच, इतक्या कमी कालावधीत त्यांना हटवण्याची अपेक्षा करणे अव्यवहार्य असल्याची टिप्पणी मुख्य न्यायमूर्तींनी केली. त्याचप्रमाणे, २०२३ मध्ये दिलेला आदेश हा महापालिकेची बाजू ऐकल्याशिवाय देण्यात आला होता आणि महानगरपालिकेला कथित अतिक्रमणे हटवण्याचे आदेश दिले होते.

# आसारामची सुरत येथील सरकारी रुग्णालयात पूजा!

■ **पुणे। प्रतिनिधी:**

बलात्काराच्या आरोपाखाली शिक्षा भोगत असलेल्या आसारामच्या फोटोची पूजा आणि आरती केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. गुजरातच्या सुरत शहरातील एका सरकारी रुग्णालयातलाहा व्हिडिओ आहे. ही घटना काल रात्री उशिरा घडली. आसारामच्या समर्थकांनी रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ त्याचा फोटो ठेवून पूजा आणि आरती केली. या वेळी मंत्रोच्चार आणि भजनेही गायली गेली. या पूजेमध्ये बालरोग विभागातील डॉ. जिगिशा पटाडिया, काही परिचारिका आणि सुरक्षा कर्मचारीही सामील झाले होते. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मोठी खळबळ उडाली आहे. हा सगळा प्रकार वादात सापडला. रुग्णालयाचे आरएमओ डॉ. केतन नायक यांनी तातडीने या प्रकरणात कारवाई केली आहे. त्यांनी सांगितले की, काही लोकांनी फळे वाटण्याची परवानगी मागितली होती, जी मी तोंडी दिली होती. पूजेची माहिती मिळाल्यावर मी तातडीने माझ्या सहकाऱ्याला तिथे पाठवून सर्व प्रकार बंद करायला लावला. या घटनेनंतर रुग्णालयाच्या सुरक्षा रक्षकाला काढून टाकण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com